INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# बाबू बिरादार ह्यांच्या कादंबऱ्या : देगलूरचा सांस्कृतिक दस्तऐवज

**डॉ. संजयकुमार कोळी**
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभाग,
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे
E-mail: Sanjaykumar.koli@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/12.2021-14669857/IRJHIS2112002**

**प्रस्तावना :**

स्वतःची एक अस्सल ओळख आणि सांस्कृतिक चेहरा असलेल्या देगलूरच्या परिसरातील एक महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून बाबू बिरादार ह्यांची ओळख आहे. 'मातीखालचे पाय' (१९८०), 'कावड' ( १९८२ ), 'अग्निकाष्ठ' (१९९५), 'गोसावी' (२०००), 'अंत पुरुष' (२००२), 'संभूती' (२००४), आदिवास (२०२१), ह्या त्यांच्या कादंबऱ्या. देगलूरचा परिसर म्हणजे आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र ह्या तीन राज्यांचा, पर्यायाने संस्कृतीचा संगम, अशा ह्या तीन राज्यांच्या भाषांच्या, संस्कृतीच्या संगमातून आकाराला आलेली माणसांची जीवनपद्धती, चालीरीती, भाषा, परंपरा ही ओळख येथील माणसांची पोशाखपद्धती, घरेदारे, इरसालपणा, जगण्याची चिवट झुंज, पुरुषसत्ताक पद्धती, अधिक दारिद्यामुळे येणारा वांझोटा वैताग, जगावेगळे बोलण्याची रीत, माणसांचा स्वभाव, सामाजिक - सांस्कृतिक संकेत, स्वभावांच्या नाना तऱ्हा, सारखे स्वतःला दुरुस्त करत जगणे, स्वभावातला आडमुठेपणा, 'सुभ जळाला तरी पिळ न जाणारा माणूस' ह्या सगळ्या अस्सल असण्यासकट माणूस जशास तसा जिवंत उभा करणे हे बाबू बिरादार ह्यांच्या लेखनीचे सामर्थ्य ठरते.

भीमा, तानी, हूलू, वाघजी, मारत्या, विठ्ठलराव, सीताराम मास्तर, सुभान्या ह्यांच्या अस्सल ताण्याबाण्यां सकट मराठी साहित्यात प्रतिनिधित्व करणारी स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी कादंबरी म्हणजे 'संभूती'. जबाबदार स्त्रियांच्या कर्तृत्वाचा आलेख आणि वंशसातत्याच्या प्रेरणेपोटी चाललेली धडपड, सृजनाचा प्रामाणिक लढा, माणसामाणसातल्या संवाद ओल न आटल्याचे उदाहरण म्हणजे 'संभूती', 'संभूती' म्हणजे वंशाच्या दिव्यासाठी जंगजंग पछाडणं, निर्मितीचा थयथयाट, एका जिद्दी, मानी, चिवट आणि जगावेगळा समजुतदारपणा असलेल्या स्त्रीचं अनोखं दर्शन, नियतीचा चाललेला उलटा प्रवास, माणसाच्या पूर्णत्वासाठी चाललेला प्रयत्न, 'वादीपायी हाल्या कापणारा नवरा पदरात पडला तरी' न डगमगणाऱ्या जहाबाज मर्द स्त्रीचं भेदक, भयप्रद : पण वास्तव चित्र. माणूस स्त्री असण्याच्या सगळ्या शक्यतांसकट झालेल्या पडझडीची कहाणी, मराठी साहित्यप्रवाहाला देगलूरी बोलीचा डग,

बाज आणि डौल प्राप्त करून देण्याचं कार्य ' संभूती ' ह्या कादंबरीने केले .

'संभूती' कादंबरीमधील काळ आणि अवकाश लक्षात घेतल्यास आपण ह्या कादंबरीच्या अधिक जवळ जाण्याची शक्यता आहे. ह्या कादंबरीचा काळ कोणता, असा प्रश्न विचारल्यास जागतिकीकरणानंतरच्या काळात आकाराला आलेली ही कादंबरी आहे, असे एक ढोबळ उत्तर देता येईल. पण हे पूर्णाशांने कादंबरी समजून घेण्यासाठी नक्कीच उपयुक्त नाही. कारण दोन प्रवासाच्या मधल्या काळात ही कादंबरी आकाराला आलेली आहे. तानी आणि तानीची पहिली सासू भीमा ह्या दोघी नदीकाठाने बोरगावला जाण्यासाठी निघाल्या आहेत. वाघजीच्या मृत्यूनंतर म्हणजेच स्वत:च्या मुलाच्या मृत्यूनंतर आपल्या मागे तानीचा निभाव लागणार नाही म्हणून सासू सुनेचे दुसरे लग्न लावण्यासाठी निघाली आहे. कादंबरीची सुरुवात ह्या पहिल्या प्रवासापासून होते. तर आपला दुसरा नवरा (मारत्या) ह्याच्या मृत्यूनंतर सुचवूनही झालेल्या हवालदिलीमुळे रात्री तानी हुलूला सोडून नदीकाठाने प्रवासाला निघते. ह्या दोन प्रवासाच्या मधला काळ हा ह्या कादंबरीचा काळ आहे. ह्या दोन प्रवासामधल्या अवकाशात ही कादबरी आकाराला येते. कादंबरीच्या सुरुवातीला झालेला प्रवास हा निश्चित ध्येय गाठण्यासाठी झालेला आहे, तर दुसरा प्रवास जीवनाचा साथीदार अर्ध्यावर डाव सोडून गेल्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत एक स्त्री दुसऱ्या स्त्रीची कोणत्याही अर्थाने जबाबदारी घेऊ शकत नाही. ह्या अर्थाच्या झालेल्या संवादाने झाला आहे.

या कालावकाशात घडलेल्या घटनांच्या संदर्भात नीट विचार केला, तर हा कादंबरीची रचना लक्षात येईल. कादंबरीची सुरुवात तानी आणि सासू भीमा ह्या दोघींच्या प्रवासातील संवादाने झाली आहे. त्या दोघी उद्याच्या लग्नासाठी निघाल्या आहेत. स्वत:चा मुलगा वाघजी सर्प चावून मेल्यामुळे भीमा स्वतःच्याच सुनेचे लग्न लावण्यासाठी तानीला बोरगावला घेऊन जात आहे. रात्रीचा प्रवास, दोनच बायामाणसं. त्या अर्थाने गंभीर परिस्थिती; पण तानीला ह्या गोष्टींचे भान नाही. ती आपल्याच धुंदीत भीमाबाईला 'भूलईचं गाणं म्हणा, नाहीतर मीच गुण्याघोडीचं किंवा गर्भार हरिणीचं गाणं म्हणण' असे म्हणते. जगरहाटी न कळालेली स्त्री किंवा तसा स्वभाव ह्या तिच्या स्वभावावर वैतागून भीमा म्हणते, 'अगं, तू बाईसारखी बाई, एक नवरा सर्प चावून मेला, दुसरा करून घेण्यासाठी निघालीस... त्याचं सुख ना दु:ख ! कुठं गाण म्हण तर कुठ कथा सांग, जनावरासारख जनावर, तेही बाजाराला जायचं म्हणजे गळयातील दाव्याची तोडघाल करतं. तू बाईमाणूस... 'अशी तानी. तिला विधवा झाल्याचे दुःख नाही. आपले गाठोडे कोणाच्या तरी आधीन आहे. ह्या विचाराने निर्धास्त, तर तिच्या आयुष्याच्या वहिवाटीची काळजी भीमाबाईला. ह्याविषयी भाष्य करताना द. ता. भोसले म्हणतात, 'आतापर्यंत मराठीत फारसे व्यक्त न झालेले अनेक सूत्ररूपाने सांगायचे झाले, तर आजच्या लेखकाने आपल्या वेडपट पोराच्या अपघाती मृत्यूनंतर आपल्या तरुण देखण्या व विधवा झालेल्या सुनेच्या सासूने पुढाकार घेऊन नव्याने विवाह केल्याचा एक विदारक अनुभव चित्रित केला आहे.'

तानीचा जन्म काशिनाथ आणि अंजनबाईच्या पोटी झाला, तानीचा बाप गावाच्या कडेला असलेल्या लिंबाच्या झाडीखाली दिवसरात्र बसून राहायचा. एक - दोन करीत एकामागून एक चार पोरी जन्मल्या. पोरगं होईल, म्हणता म्हणता तो लिंबाखालीच मेला, गाव त्या लिंबाला 'काशाचं झाड' म्हणून ओळखत. काशीनाथ पोरीच्या लग्नाच्या काळजीपायीच मेला, अशी गावात चर्चा; पण तो तंबाखूच्या अकड्याने मेला. काशीनाथच्या

मृत्यूनंतर अंजनबाईने वाघजीबरोबर तानीचे लग्न लावून दिले. वाघजीही मेला. दिराच्या वळचणीला निभाव लागेना म्हणून लहान जावई मोठा जावई करीत अखेर अंजनबाईन जावायाच्याच घरी लहान पोर ठेवून जीव दिला. गावकऱ्यांनी कुणाचे मढे कुणाला सुतक, म्हणून पांदीत पुरून टाकले, अशी ही तानीच्या आई - वडिलाची कथा. समकालीन कादंबरी विश्वा पेक्षा वेगळे असे सूत्र घेऊन बाबू बिरादार यांनी मांडणी केलेली दिसून येते.

एखाद्या कुटुंबातील व्यक्ती मरण पावली, तर सामाजिक संकेत असा पाळला जातो की, त्या कुटुंबातील एखादी व्यक्ती लग्नाची असेल, तर पहिल्याच वर्षी लग्न अन्यथा तीन वर्ष नाही. तानीच्या पहिल्या लग्नाच्या बाबतीत हीच गोष्ट घडली. अजंनबाई रंडीमुडी. भीमाबाईनेच पुढाकार घेऊन तानीचे लग्न जमवले. रंडकीच्या पोरीला करून पोराचा गळा कापू नये. तिच्याने करणी धरणी होत नाही. म्हणून मणगुण्या विठ्ठलाने विरोध केला. शेवटी ओढाताण झाली. तानीचे वाघजीबरोबर लग्न झाले. नंतर ओटीभरणाच्या कार्यक्रमाशेवटी भीमाबाईलाच पुढाकार घ्यावा लागला. स्वतःचा नाकर्तेपणा झाकण्यासाठी विठ्ठलने थोडी गर्दी केली; पण भीमाबाईनेच निभावून नेले. भीमाबाई ही पक्की जहाबाज स्त्री होती. लग्न होण्याआधी एक - दोन वेळा विठ्ठलने भीमाबाईवर हात उचलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भीमाबाई म्हणाली, 'उगं बिनइषाच्या सरपासारख्या हागल्या - मुतल्या गोष्टीलाबी फिसू फिसू करत अंगावर येऊ नगंस. तुझ्या कष्टाला धक्का मी लावला तर जाळून टाक. 'ही कर्तबगारी आणि करारीबाणा असलेला भीमाबाईचा विठ्ठल अशी तिच्या नवऱ्याची ओळख आहे. हीच एक ह्या कादंबरीची आगळिकता.

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीची ओळख पुरुषाच्या आश्रयाने ठरविली जाते; पण येथे पुरुषाची ओळख स्त्रीच्या कर्तबगारीने होते. स्त्री ही कुणाची तरी बहीण, नात, मुलगी, सून आणि बायको असते. पण ह्या कादंबरीतील विठ्ठलची ओळख 'भीमाबाईचा विठ्ठल' अशी आहे. भीमाबाई बोलली तशी चालणारी, चागुलपणा जपणारी, जिद्दी स्त्री होती. इतराच्या लेकराचे उणेदुणे काढणे तिला पसंत नाही. म्हणून वाघजीची तुलना ती मांजराच्या गुवाबरोबर करते. मांजराचे गू कितीही लपवले तरी वास येणारच. तसा वाघजी आणि विठ्ठल. मात्र कर्तासवरता पोरगा वाघजी बनात सरप चावून मेला, त्याला वरीस झालं नाही. जवान सून घरात एकटी. विठ्ठल मात्र नवीन दादूलपण आल्यासारखे भीमाबाईच्या बाजेवर चढू उतरू लागला आणि व्हायचे तेच झाले. भीमाबाई गाडग्याएवढे पोट घेऊन फिरू लागली. ह्या काळात तानीनेच भीमाबाईचा सांभाळ केला. भीमाबाई काहीही झाले तरी तानीचे दुसरे लगीन लावून द्यायचे, ह्या जिद्दीने पेटलेली. विठ्ठल मात्र तानीच्या अंगावरील सणगे विकून शेजारचे शेत घ्यावे, असा धोरणी विचार ठेऊन आहे. तानीच्या लग्नाला विरोध करणारा विठ्ठलराव हेड्याचा धंदा करणारा. देगलूरच्या परिसरातील नायगाव, औराद, मरखेल, देगलूर ही जनावरांचा बाजार भरणारी केंद्र, ह्या बाजाराचे जनावर त्या बाजारात नेऊन विकणे, त्यातल्या नफा, तोट्याचा विचार करणे हा विठ्ठलाचा धंदा. तो जनावराकडे ज्या फायद्याच्या दृष्टीने बघतो, तीच दृष्टी विठ्ठलाची तानीकडे बघण्याची आहे.

कादंबरीमध्ये आलेले बोरगावच्या माणसांचे वर्णन बघितले की, आजही खेड्याची किती विदारक अवस्था झालेली आहे, हे लक्षात येते. ह्याच बोरगावचे मारत्या आणि हुलबाई वंशाला दिवा असावा, ह्या इर्षेने पेटलेले आहेत. चाळीशी ओलांडून पन्नाशीच्या घरात आलेला गडी मारत्या. हुलबाईला स्वतःला लेकरू व्हायची अशा संपलेली; पण

स्वत:च्याच नवऱ्याला दुसरे लगीन करून सवतीला मूल झाले, तरी मारोतरावाचेच म्हणून गाव ओळखणार, असा विचार मनात बाळगून बसलेली. ह्या बाबतीत मारोतरावांचे विचार म्हणजे 'लेकरू झाल्यानंबी बरंच न झाल्यानंबी बरंच भावभावजयाचे बक्कळ हाईत की... असा. पण आपल्या लेकराची बढाई दुसऱ्या लेकराला येत नाही, म्हणून मारोतीला लग्नाला तयार केले. त्याच्या मनात कुटुंबविघटनाची सल आहे. म्हणून त्याचा लग्नाला नकार आहे. तर विठ्ठलच्या मनात घर सांभाळायला फुकटची बाई मिळते असे हूलबाईचे विचार तानीची ससेहोलपट दाखविणारे आहेत. 'काय परकार हाय ! हामाला लेकरासाठी पोरगी पायजे. अन् तुमच्या नवऱ्याला घरचे लेकर सांभाळायला फुक्कटची बाई पायजे. कुटबी चांगल्या पोरीची हीच बोब हाय. त्यानं सोडीना अन् ह्यानं ठिवना'. हा संवाद भीमा आणि हुलबाई ह्यांच्या मनात चालला असताना तानीच्या ओठावर मात्र वेगळेच गीत उमटत होते. हे गीत तानी, भीमा, हुलू ह्या सगळयांच्या जीवनाचे विस्कटलेले, उसवलेले सत्य सांगते. 'दोघी बहिणी सवती एक गोधडी शिवती, चिंधी - चिंधी गोळा केली, किती आपुपानं बाई, दोरा हरवून गेला सूई सापडत नाई. 'ही अवस्था खेड्यातल्या सगळयाच स्त्रियांची आहे.

हुलबाई दिसायला अतिशय लहान; पण चकमकीच्या रूईसारखी घाग, स्वतःला मूल व्हायची अशा संपलेली आहे. भावजयांच्या उरावर नवऱ्याचे लगीन करून त्याला लेकरू करायचे व वंशाला दिवा तेवत ठेवायचा, ह्या इर्षेने पेटलेली. पण ज्याच्या जोरावर ही इर्षेला पेटली, तो मात्र अतिशय आळशी, इर्षा संपलेला उरफाटा माणूस आहे. दिवसभर पारावरच्या लिंबाच्या खोडाला टेकून बसायचा अन् संध्याकाळ झाली की, चोऱ्या करायला निघायचा . असा नवरा पदरात पडल्याचे दुःख कोणत्या स्त्रीला असणार नाही . तरीपण सोन्यासाठी चिंधी जपावी लागते , ह्या न्यायाने ती मारुतीला जपायची. त्याला मुलगा व्हावा म्हणून तानीचे त्याच्याबरोबर लग्न लावले; पण हा तानीसोबत नीट झोपायला तयार नाही. तोदेखील म्हणतो, 'मला नवीन बायको केलीस तर मी बिडी सोडून देतो का?' (संभुती, पृष्ठ, १०५) असा नवरा सांभाळायचा म्हणजे वाटच्या वाटसरूला धरून संसार केल्यासारखं होय. त्यातच तानीऐवजी हुलबाईच्या पोटी धोंडिबाचा जन्म झाला. मारुतीला तुपाचा ठसका लागला. नाकातोंडावाटे पाणी आले. तो तसाच बाजेवर लवंडला, एक जीव घरात नव्याने येतोय आणि दुसरा जीव परतीच्या प्रवासाला लागला आहे. ह्या परिस्थितीचे वर्णन लेखक करताना म्हणतो, 'धाट निसवलं पण कणसानं काजळी धरली'. 'शेतातील पाखरं सैरभैर झाली. आणि त्यांनी खोपा कुण्या फांदिला बांधावा' ह्या पाखरासारखीच स्त्रीची अवस्था झालेली सूचित होते.

कादंबरीभर माणूस बनून वावरणारी , कुटुंब चालवणारी गंगा म्हैस ह्या कादंबरीतील एक वेगळेपण . माणसे जनावरांना जीव लावायला लागले की, जनावरेही माणसांना जीव लावायला लागतात. जागतिकीकरणाच्या रेट्यात माणसाचा माणसाशी नीट संवाद होत नाही, एकमेकांचा आवाज एक दुसऱ्याला कळणार नाही एवढ्या विसंवादाने जगाची वाटचाल सुरू आहे. येथे मात्र हुलुचे दुःख गंगा म्हशीपर्यंत पोहोचते. कपाळाचे कुकू टिकावे म्हणून गंगी म्हैस हुलूला सूर्यदेवाला नमस्कार घालायला सांगते. नवीन दावे वळून बांधायला मारुतीमालक बिमार आहे. म्हणून ती दावे तोडू शकत नाही. बराच वेळ जागेवरच बसून राहते, तर हुलू म्हणते 'राड काळया खुट्यालाच माय ! घराबरोबर तिलाबी वनवास'. (पृ . १४२) म्हणून तिची काळजी वाहते.

पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्री, ही समाजाची स्त्रीची कल्पनाच असह्य वाटते. 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या काव्यसंग्रहात प्रज्ञा लोखंडे म्हणतात त्याप्रमाणे, 'एक बाई करून करून काय करेल आगीतून निघाली तर फुफाट्यात पडेल, फुफाट्यातून निघाली तर आगीत पडेल. आग आणि फुफाटा, दोन पर्याय आहेत भावेला एका किरकोळ बाई प्रमाणे, आग आणि फुफाटा मारुती नाहीतर वाघजी, वाघजी नाहीतर सीताराम मास्तर, असेच पर्याय आहेत.

समाजातल्या बऱ्याच स्त्रिया नवऱ्याआधी मला मरण यावे, अशी मागणी करीत असतात. ह्याचे प्रात्यक्षिक मारुती मेल्यानंतर हुलू आणि तानीच्या वाट्याला आलेल्या जगण्यात सापडते. त्या आर्थाने संबंध नसलेली माणसेही मेल्याहून मेल्यासारखे व्हावे असे काहीतरी बोलून जातात. जगणे असहा झालेली माणसे सदैव मृत्यूची मागणी करतात. मरणारा सुखाने जातो; पण वेदना आणि दुःख मात्र राहणाऱ्याच्या खांद्यावर असते. त्यातल्या त्यात नवरा आधी गेला आणि बायको जिवंत असेल, तर ती वेदना वेगळीच असते. ह्याबद्दल लेखक म्हणतो, 'शरीर संपलं की वेदना थांबते पण इथे पुरुषाचे शरीर संपले की स्त्रीची वेदना सुरू होते. स्त्रीने नक्की काय भोगावं म्हणजे ती पुरुषांशिवाय सुखी होऊ शकेल. तिचं दुःख पुरुषाच्या जगण्यात आहे. त्याहून अधिक आगळं दुख त्याच्या मरण्यात आहे. म्हणजे असून तर सुख नाहीच, पण नसूनही नाही. ह्या वेदनेचा कळस म्हणजे ह्या कादंबरीतील सीताराम मास्तराने तानीला घातलेली मागणी होय. अशा अनेक बहुसांस्कृतिक संदर्भाने संभुती कादंबरी समकालीन साहित्य व्यवहारात महत्त्वाची आहे. समकालीन लेखक आपेक्षा बाबू बिरादर यांच्या लेखनातील गुंतागुंत बौद्धिकतेच्या सर्वोच्च पातळीवर घेऊन जाणारी आहे. पुरुषातील वाईट प्रवृत्तीचा नायनाट करून सर्जनशील विचार करण्यास भाग पाडायला लावणारी स्त्री बिरादार यांच्या साहित्यात केंद्र म्हणून उभी राहते. तसेच बाबू बिरादार यांच्या लेखनात अवतीभवतीची परिस्थिती, सांस्कृतिक वातावरण, सामाजिक पर्यावरण बिरादार ज्या ग्रामीण भागातून लेखन करतात तेथील शैक्षणिक परिस्थिती या सर्व घटकाचा परिणाम त्यांच्या लिखाणावर झालेला दिसतो.

बाबू बिरादार हे जागतिकीकरणा पासून आणि शहरापासून खूप दूर असणारे कुठल्याही चळवळीचा गंध नसलेले, आर्थिक दारिद्र्य, कमकुवत शिक्षणव्यवस्था असल्यामुळे, त्यांचे मातीशी असलेले संबंध नैतिक मूल्यांची जपणूक सर्जनशील पणे करतात. बिरादार यांच्या आजपर्यंतच्या लेखनावर जागतिकीकरणाचा परिणाम फारसा दिसत नाही. तसेच समकालीन लेखक जागतिकीकरण सहजपणे केंद्रबिंदू बनवतात. परंतु बाबू बिरादाराचे समकालीन लेखकापेक्षा हे वेगळेपण आहे. ग्रामीण जीवनातील मूल्यऱ्हासाची मांडणी करतात.बाबू बिरादार हे सांस्कृतिक अंगाने लेखन करणारे एक महत्त्वाचे लेखक म्हणून त्यांचा विचार करणे प्रस्तुत ठरते.

**संदर्भ ग्रंथ सूची** :

१. 'मातीखालचे पाय', साकेत प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती : १९८०
२. 'कावड', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती : १९८२
३. 'अग्निकाष्ठ', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती : १९९५
४. 'गोसावी', साकेत प्रकाशन , औरंगाबाद, प्रथमावृत्ती : २००२
५. 'अंत: पुरुष', देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती : २००२
६. 'संभूती', देशमुख आणि कपंनी, पुणे, प्रथमावृत्ती : २००४